# शिक्षणाधिकारी (प्राथमिक)जिल्हा परिषद सोलापूर RTE Act २००९
## मान्यता/नुतनीकरण २०२२ ते २०२५ मान्यता आदेश.
## नमुना दोन

जाक्र.जिपसो/शिक्षण/खाप्राशा.२/प्राथ./RTE/मा.नु/ १०८
सोलापूर दिनांक १३ / ०३ /२०२३

प्रति,

मुख्याध्यापक,
सिंहगड पब्लिक स्कूल, कमलापूर, ता.सांगोला, जि.सोलापूर
(शाळेचा युडास क्रमांक :२७३००९०४७०७)

**विषय :-** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजार्थ,बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११ पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सांगोला कार्यालयाकडे सन **२०२२ ते २०२५** पर्यतच्या आरटीई मान्यतेच्या/नुतनीकरणासाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सांगोला यांनी शाळेची तपासणी करुन सदर शाळा नियमानुसार आरटीई ॲक्ट २००९ अन्वये भौतिक सुविधा पूर्ण करीत असलेने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सांगोला यांचेकडील पत्रानुसार आरटीई मान्यते बाबतच्या शिफारसीसह स्व-प्रतिज्ञापत्रास आधिन राहून,

मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सोलापूर **०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२५** पर्यंतच्या कालावधीसाठी **इयत्ता १ली ते ८वी सिंहगड पब्लिक स्कूल, कमलापूर, ता.सांगोला** या शाळेस तात्पुरती RTE-२००९ अंतर्गत नुतनीकरणाने मान्यता देण्यात येत आहे.

**सदरची मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या आधीन राहून देण्यात येत आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही. आणि इयत्ता **८वी** नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

३. शाळा विनाअनुदानीत असल्यास नजीकच्या दुर्बल घटकांतील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या **किमान २५% मर्यादेपर्यत** प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल, परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तेच्या बाबतीत देखील या प्रमाणकांचे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेले बालकांकरीता शाळेला अधिनियमाचा कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळा स्वतंत्र बँक खाते देईल.

५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटीशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. शाळा कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी किंवा धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो ज्या इयत्तेत शिकत असेल त्या इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकांस शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकांस प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक

असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकांस नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

(पांच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमांच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता पाच वर्षाच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची/तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकांने/शिक्षिकेने खाजगी शिकविण्याच्या कामात स्वत:ला गुतंवून घेवू नये,याची सुनिश्चिती शाळा करेल.

८. शाळा समुचित प्राधिकरणांने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमांचे पालन करील.

९. शाळा अधिनियमांच्या कलम २९ मध्ये विहित केलेप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमांच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. शाळा तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा आर.टी.ई. च्या दहा निकषांची पुर्तता करीत असलेबाबत **सदर शाळेकडुन / गटशिक्षणाधिकारी** यांचेकडून स्व-प्रतिज्ञापत्र दिलेले आहे.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम व क्रिडांगण हे केवळ शिक्षणांच्या व कौशल्यविकासाच्या प्रयोजानार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजाकि विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदया करीता किंवा नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखा परीक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्रांची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेताक (**२७३००९०४७०७**) असा आहे. हा या कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/शिक्षणाधिकारी हे वेळोवळी मागणी करतील, असे अहवाल व माहीती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल, अशा सुचानांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही कागदपत्रे असल्यास नुतनीकरणाने सुनिश्चित करावी.

**टिप:-** शाळेतील मुख्याध्यापकांनी **सन २०२२ ते २०२५** पर्यतच्या आरटीई मान्यता/नुतनीकरणासाठी संबंधित गटशिक्षणाधिकारी/प्रशासनाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेली ओसी(दुय्यम) नस्ती/फाईल पृष्ठ क्रमांकासह आपल्याकडेच व्यवस्थित जपूण ठेवावी. भविष्यात माहिती अधिकारीतील अर्ज कायदेशीर व नियमानुसार शाळेकडे वर्ग करण्यात येईल याची नोद घ्यावी.

(संजय जावीर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, सोलापूर

**प्रत :** गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सांगोला यांना माहितीसाठी अग्रेषित.

**Campus Director**
Savitribai Phule Shikshan Prasarak Mandal, Kamalapur Tal. Sangola
Dist. Solapur Pin: 413307

**Principal**
Sinhga[illegible] School
Kamalapur Ta[illegible] Dist.Solapur